प्रेस नोट क्र /२०२५
दि. २०/०९/२०२५

# प्रेस नोट – सांगली पोलीस

## सीसीटीएनएस प्रणालीच्या कामकाजामध्ये सांगली जिल्हा पोलीस दलाचा संपुर्ण महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक

मा. अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांचेकडुन राज्यातील सर्व जिल्हयामध्ये सीसीटीएनएस ( क्राईम ॲण्ड क्रिमीनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टीम – गुन्हा आणि गुन्हेगार तपास जाळे प्रणाली ) संगणक प्रणाली कार्यरत आहे. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाद्वारे प्रत्येक महिन्यात सीसीटीएनएस प्रणालीच्या कामगीरीचा राज्यस्तरीय घटक निहाय आढावा घेण्यात येतो. त्या अनुषंगाने सीसीटीएनएस प्रणालीच्या राज्यातील ५३ घटकांच्या मासिक कामगिरीचे मुल्यांकन केले असता यात सांगली जिल्हाने सन २०२४ – २०२५ मध्ये सातत्य राखत १४ वेळा पहील्या ३ क्रमांकामध्ये स्थान प्राप्त केले आहे. सीसीटीएनएस कार्यप्रणाली अंतर्गत दैनदिन प्रभावी वापरामध्ये व अचुकता राखण्यात, अदयावत माहिती भरण्यात, नागरीकांच्या ई – तक्रारी इत्यादीबाबत जलदगतीने निर्गती केल्याबाबतच्या **उत्कृष्ट कामगिरी बदद्ल सांगली जिल्हा पोलीस दलाने राज्यात प्रथम क्रमाक पटकविलेला आहे.**

नागरीकांना कोणत्याही प्रकारे असुविधा होणार नाही तसेच जिल्हयातील सर्व पोलीस ठाण्याचे सर्व कामकाज हे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे करून कामकाज हे ऑनलाईन पध्दतीने करण्यावर विशेष भर देण्याबाबत मा. पोलीस अधीक्षक, संदीप घुगे सर, मा. अपर पोलीस अधीक्षक, कल्पना बारवकर मॅडम यांनी सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना वेळोवेळी मार्गदर्शन व सुचना दिल्या आहेत. याच अनुंषगाने सांगली जिल्हा पोलीस दलाने उत्कृष्ट कामगिरी करत राज्यात सर्वाधिक गुण प्राप्त करून प्रथम क्रमाक प्राप्त केला आहे. याबाबत मा. पोलीस अधीक्षक संदीप घुगे सर, मा. अपर पोलीस अधीक्षक श्रीमती कल्पना बावरकर मॅडम ( नोडल ऑफीसर, सीसीटीएनएस प्रणाली, सांगली. ), पोलीस निरीक्षक सतीश शिंदे, यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक रूपाली बोबडे, पो.हे.कॉ/३५१ नितीन बराले, म.पो.ना/२०६० सलमा इनामदार यांनी विशेष दखल घेवुन सीसीटीएनएस प्रणालीच्या कामकाजावर बारकाईने लक्ष ठेवुन वेळोवेळी जिल्हयाच्या कामकाजाचा आढावा घेतला तसेच सीसीटीएनएस प्रणालीच्या कामकाजात येणा–या अडचणींवर अतिशय चांगल्या प्रकारे

प्रेस नोट क्र /२०२५
दि. २०/०९/२०२५

उपाययोजना करून संबधीत सीसीटीएनएस प्रणालीचे कामकाज करणाऱ्या अधिकारी व अंमलदार यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. त्यामुळेच सीसीटीएनएस प्रणालीमध्ये **सांगली जिल्हा पोलीस दलाने उत्कृष्ट कामगिरी करून प्रथम क्रंमाक पटकविला आहे.**

दि. १९/९/२०२५ रोजी पुणे येथे आयोजीत पोलीस कर्तव्य मेळावा २०२५ अंतर्गत सीसीटीएनएस कार्यप्रणाली मध्ये राज्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस घटकांना बक्षीस देवुन गौरविण्यात आले. त्यानुसार माहे नोव्हेंबर २०२४ ते जुन २०२५ मध्ये राज्यात सीसीटीएनएस प्रणालीमध्ये उत्कृष्ट कामगिरी बाबत सांगली जिल्हा पोलीस दलास प्रथम क्रंमाक प्राप्त झाला आहे. सदरच्या पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये मा.अपर पोलीस महासंचालक, CID, महाराष्ट्र राज्य, पुणे. श्री. सुनिल रामानंद सर, मा.अपर पोलीस महासंचालक, वायरलेस, श्री. दीपक पांडे सर, मा. पोलीस आयुक्त पुणे शहर, श्री. अमितेश कुमार सर, मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापुर परिक्षेत्र श्री. सुनील फुलारी सर व इतर वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. श्रीमती रश्मी शुक्ला मॅडम, यांच्या हस्ते मा.पोलीस अधीक्षक, संदीप घुगे सर, सहा. पोलीस निरीक्षक रूपाली बोबडे, पो.ह. नितीन बराले, म.पो.ना. सलमा इनामदार यांनी सांगली जिल्हा पोलीस दलातर्फे प्रथम क्रंमाकाचे चषक स्विकारले.

सांगली जिल्हयात सीसीटीएनएस कार्यप्रणालीचे कर्तव्य करणारे सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच प्रभारी अधिकारी यांचे मा. पोलीस अधीक्षक, संदीप घुगे व अपर पोलीस अधीक्षक, कल्पना बावरकर, सांगली ( नोडल ऑफीसर, सीसीटीएनएस प्रणाली, सांगली ) यांनी अभिनंदन केले आहे.

( रूपाली बोबडे )
सहा.पोलीस निरीक्षक
सायबर पोलीस ठाणे, सांगली.